# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

पहिला मजला, नविन प्रशासकीय भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई - ४०० ०३२

क्र.रानिआ/मनपा-२००६/प्र.क्र.-१९/का.५.
दिनांक :- २५ सप्टेंबर, २००८

## आ दे श

ज्याअर्थी बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या निवडणूक नियमावली २००६ च्या नियम ११४ मध्ये निवडणुकीच्या कागदपत्रांची विल्हेवाट लावण्यासंबंधी तरतूद करण्यात आली आहे.

आणि ज्याअर्थी सदर नियम ११४ मध्ये अशी तरतूद करण्यात आली आहे की, नियम ११४ च्या पोटनियम (अ) (ब) व (क) मधील कागदपत्रांव्यतिरिक्त इतर सर्व कागदपत्रे राज्य निवडणूक आयोग निर्धारित करील अशा कालावधी पर्यन्त जतन केली जातील.

त्याअर्थी मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ (१८८८ चा मुंबईतील) च्या कलम १८(अे) व बहन्मुंबई महानगर पलिका निवडणूक नियमावली २००६ च्या नियम ११४ मधील अधिकारांचा वापर करुन याद्वारे असे आदेश देण्यात येत आहेत की, बृहन्मुंबई महानगर पलिका निवडणूक नियमावली २००६ च्या नियम ११२ (२) व ११३ (१) मध्ये नमूद केलेली कागदपत्रे निवडणुकीनंतर एक वर्षाच्या कालावधीपर्यंत जतन केली जातील व त्यानंतर नष्ट करण्यात येतील. परंतु एखाद्या प्रभागामध्ये निवडणूक याचिका प्रलंबित असेत तर तिचा निकाल लागेपर्यंत ही कागदपत्रे जतन केली जातील व त्या निवडणुंक याचिकेचा निकाल लागल्यानंतर नष्ट करण्यात येतील.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

र. वि. नातू

( रचना नातू )
उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत:-
आयुक्त, मुंबई महानगरपालिका